**ठळक बातम्या**

- डिजिटल आर्थिक व्यवहारांमध्ये भारताला जागतिक पातळीवर अग्रणी करण्यात रिझर्व्ह बँकेची भूमिका महत्त्वाची असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- एक लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये बाइक टॅक्सीला परवानगी देण्याचा राज्य मंत्रीमंडळाचा निर्णय
- वक्फ सुधारणा विधेयक उद्या लोकसभेत मांडलं जाणार
- गुजरातमध्ये बनासकांठा जिल्ह्यात फटाक्याच्या कारखान्यात झालेल्या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू , केंद्र सरकारकडून आर्थिक मदत जाहीर

  **आणि**
- म्यानमारमधल्या भूकंपबळीं्ची संख्या २ हजार ७०० वर

**<><><><><>**

देशाच्या सर्व नागरिकांचा रिझर्व बँकेवरचा दृढ विश्वास ही मौलिक ठेव आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९०व्या स्थापनादिन सोहळ्याच्या समारोप कार्यक्रमात त्या मुंबईत बोलत होत्या. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

होल्ड

डिजिटल व्यवहारांमध्ये भारताला जागतिक पातळीवर महत्त्वाचं स्थान मिळवून देण्यात आरबीआयनं महत्त्वपूर्ण भूमिका निभावली असल्याचं त्या म्हणाल्या,

**होल्ड... बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू...**

प्रचंड गरीबीपासून ते जगातल्या महत्त्वाच्या अर्थव्यवस्थांमधे स्थान मिळवणाऱ्या भारताचा संपूर्ण प्रवास रिझर्व्ह बँकेनं बघितला आहे. फसवणुकीच्या वाढत्या घटना, सायबर धोके याचा सामना रिझर्व्ह बँक तत्परतेनं करत असल्याचंही

राष्ट्रपतींनी नमूद केलं. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९०व्या वर्षपूर्तीनिमित्त विशेष 'माय स्टॅम्प'चं अनावरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते यावेळी झालं.

देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनं आगामी दशक अतिशय महत्त्वाचं असून आर्थिक समावेशन, ग्राहक सुरक्षा आणि आर्थिक प्रगतीसाठी भारतीय रिझर्व्ह बँक वचनबद्ध आहे, अशी ग्वाही गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी स्वागतपर संबोधनात दिली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

महाराष्ट्रात नागरिकांना सुलभ परिवहन सेवा मिळण्यासाठी बाईक टॅक्सीला मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातल्या किमान एक लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये आता बाईक टॅक्सी धावणार असून याबाबतच्या धोरणाला राज्य मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. रस्त्यावरची वाहन संख्या कमी होण्यासाठी खासगी दुचाकी वाहनांसाठी बाईक पुलिंगच्या पर्यायालासुद्धा शासनानं मान्यता दिली आहे. बाईक टॅक्सीच्या प्रवासी भाड्याचे दर संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरण निश्चित करेल.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यासाठी, शासकीय कारभारात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या प्रभावी उपयोगासाठी राज्य शासन आणि मायक्रोसॉफ्ट यांच्यात आज सामंजस्य करार झाला. या भागीदारीअंतर्गत मुंबईत भूगोल विश्लेषण केंद्र, पुण्यात न्यायपूरक विज्ञान संशोधन आणि ए.आय. केंद्र, तर नागपूर - मार्व्हेल केंद्र, अशी तीन ए.आय. उत्कृष्टता केंद्रं राज्यात स्थापन केली जातील.

शासनाच्या सेवा अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकहितैषी बनवण्यासाठी मायक्रोसॉफ्ट Copilot तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं शासनाच्या विविध कार्यप्रणालींमध्ये लक्षणीय सुधारणा केली जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, आदी यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयक उद्या लोकसभेत मांडण्यात येणार आहे. अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू उद्या सभागृहात हे विधेयक मांडतील. विधेयकावर ८ तासांची चर्चा घेण्यात येणार असल्याचं त्यांनी संसद भवन परिसरात प्रसारमाध्यमांना सांगितलं. सभागृहाला आवश्यक वाटल्यास चर्चेचा कालावधी वाढवण्यात येईल असं ते म्हणाले. विधेयकाबाबत कोणत्याही प्रश्नांची उत्तरं द्यायची सरकारची तयारी आहे, असं सांगून ते म्हणाले की विरोधी पक्षांना अनुनयाचं धोरण राबवायचं असल्याने ते या विधेयकाला विरोध करत आहेत.

दरम्यान वक्फ सुधारणा विधेयक उद्या मांडलं जाणार असल्याच्या पार्श्वभूमीवर पुढचे ३ दिवस लोकसभेत हजर राहण्याचा पक्षादेश भाजपाने आणि काँग्रेसनेही आपापल्या खासदारांना काढला आहे.

**<><><><><>**

गेल्या आर्थिक वर्षात संरक्षण क्षेत्रातली निर्यात १२ टक्क्यांनी वाढून विक्रमी २३ हजार ६०० कोटी रुपयांच्या पलीकडे केली. त्यात संरक्षण क्षेत्रातल्या सरकारी कंपन्यांचा वाटा सुमारे ४३ टक्के म्हणजेच ८ हजार ३८९ कोटी रुपये होता. २०२९ पर्यंत देशातून होणारी संरक्षण क्षेत्रातली निर्यात ५० हजार कोटींचा आकडा पार करेल असा विश्वास संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आज व्यक्त केला.

**<><><><><>**

देशातल्या कोळसा क्षेत्रानं, काल संपलेल्या आर्थिक वर्षात १०० कोटी टन उत्पादनाचा टप्पा पार केला. कोळसा मंत्रालयानं आज याबाबतची आकडेवारी जाहीर केली. गेल्या आर्थिक वर्षात १०४ कोटी ७० लाख टनापेक्षा जास्त कोळसा उत्पादन झालं. आधीच्या वर्षापेक्षा ही वाढ ४ पूर्णांक ९९ शतांश टक्के इतकी आहे. यापैकी १०२ कोटी ४० लाख टन कोळसा गोदामं आणि प्रकल्पांमधे पाठवला गेला. हे प्रमाण देखील आधीच्या वर्षीच्या तुलनेत ५ पूर्णांक ३४ शतांश टक्क्यानं वाढलं आहे.

**<><><><><>**

देशातलं मत्स्य उत्पादन दहा वर्षांपूर्वी ९५ लाख मेट्रिक टन होतं, ते वाढून आता १८४ लाख मेट्रिक टन झालं असून आज जागतिक स्तरावर मत्स्योत्पादनात भारत दुसऱ्या क्रमांकावर असल्याचं केंद्रीय मत्स्योत्पादन मंत्री राजीव सिंग यांनी म्हटलं आहे. ते आज लोकसभेत बोलत होते.

**<><><><><>**

गुजरातमध्ये बनासकांठा जिल्ह्यात डीसा इथे आज एका फटाक्याच्या कारखान्यात आग लागून १७ जणांचा मृत्यू झाला. या कारखान्यात आधी फटाक्यांचा स्फोट झाला, त्यामुळे इमारतीचा काही भाग कोसळला आणि अनेक कामगार ढिगाऱ्याखाली अडकले. अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण आणलं असली तरी ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी बचाव कार्य सुरू आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षकांनी दिली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे आणि मृतांच्या कुटुंबियांना २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

भारत आणि चिली यांच्यात व्यापार आणि गुंतवणूक वाढवण्यासाठी एक सर्वंकष आर्थिक भागिदारी करार करण्याच्या दृष्टीनं चर्चा सुरु करण्याबाबत दोन्ही देशांनी सहमती व्यक्त केली आहे. चिलीचे अध्यक्ष गॅब्रिएल बोरीक फोन्ट यांच्या भारत भेटीबाबत बातमीदारांशी बोलताना परराष्ट्र मंत्रालयातले पूर्व विभागाचे सचिव पेरियासामी कुमारन यांनी ही माहिती दिली.

**<><><><>**

तिसरा भारत जपान संवाद आज जपानची राजधानी टोकियो इथं झाला. अंतराळ विज्ञान क्षेत्रात उभयपक्षी हिताच्या मुद्द्यांवर यावेळी चर्चा झाली.

**<><><><>**

बदलत्या काळानुसार देशातल्या गुन्ह्यांचा तपास लावण्यासाठी कायदे पुरेसे नसून त्याला तंत्रज्ञानाची जोड देण्याची गरज केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केली. सीबीआयमध्ये २१ व्या डी. पी. कोहली स्मृती व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी त्यांनी सीबीआयच्या अधिकाऱ्या राष्ट्रपती पदक वितरीत केली.

**<><><><>**

म्यानमारमधल्या भूकंपात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या २७०० वर पोहोचली आहे. मृतांची संख्या तीन हजाराच्या वर जाण्याची शक्यता असल्याचं म्यानमारचे लष्करी नेते मीन आँग हलैंग यांनी सांगितलं. साडे चार हजारपेक्षा जास्त नागरिक जखमी झाले असून ४४१ जण अजूनही बेपत्ता आहेत. मृतांमधे ५० विद्यार्थी आणि दोन शिक्षकांचा समावेश असल्याचं संयुक्त राष्ट्रांच्या मानवतावादी व्यवहार समन्वय कार्यालयाने म्हटलं आहे.

मॅनमारमधे बचावकार्य मोठ्या प्रमाणात सुरू आहे. ऑपरेशन ब्रह्मा अंतर्गत भारताने मदत पथक, वैद्यकीय पथक आणि इतर जीवनावश्यक वस्तू पाठवल्या आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भरमसाठ आयात शुल्क लादणार असल्याच्या शक्यतेनं नवीन आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी देशातल्या शेअर बाजारात मोठी घसरण झाली. सेन्सेक्स आज १ हजार ३९० अंकांनी घसरुन ७६ हजार २४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३५४ अंकांची घट नोंदवून २३ हजार १६६ अंकांवर स्थिरावला. तेल आणि नैसर्गिक वायू तसंच दूरसंचार क्षेत्र वगळता इतर सर्वच क्षेत्रातले समभाग आज घसरले. राज्यात रेडी रेकनर दर वाढल्याचा विपरीत परिणाम बांधकाम क्षेत्रातल्या कंपन्यांवर झाला.

**<><><><><>**

वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडिओ-व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिटचा एक भाग असलेल्या क्रिएट इन इंडियाच्या पहिल्या पर्वात ८५ हजारांच्या नोंदणीचा टप्पा गाठला आहे. यात ११०० आंतरराष्ट्रीय स्पर्धकांचा समावेश आहे. विविध प्रकारच्या ३२ प्रकारांसाठी घेण्यात आलेल्या फेऱ्यांमधून ७५०हून अधिक स्पर्धकांची निवड अंतिम फेरीसाठी करण्यात आली आहे. या परिषदेची अंतिम फेरी येत्या १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौ इथं लखनौ सुपर जायंट्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात सामना सुरु आहे. पंजाबनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा लखनौ सुपर जायंट्सच्या ९ षटकात ३ बाद ६१ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

विमान उपकरणं हितसंबंध संरक्षण विधेयक २०२५ आज राज्यसभेत मंजूर झालं. भारत हा जगातला तिसरा सर्वात मोठा देशांतर्गत नागरी विमान वाहतूक बाजार असलेला देश असल्याचं, विधेयकावरल्या चर्चेला उत्तर देताना नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी सांगितलं. गेल्या दहा वर्षांत विमान वाहतूक क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे, असं ते म्हणाले.

त्रिभुवन सहकारी विद्यापीठ विधेयक आज राज्यसभेत विचारार्थ आणि मंजुरीसाठी मांडण्यात आलं. आनंद ग्रामीण व्यवस्थापन संस्थेला त्रिभुवन विद्यापीठ म्हणून प्रस्थापित करणं हा या विधेयकाचा हेतू आहे. ही संस्था सहकार क्षेत्रात प्रशिक्षण देण्याचं काम करेल.

**<><><><><>**

मलेशियात आज गॅस पाईपलाईनला आग लागल्याने १०० जण जखमी झाले. ही गॅस पाईपलाईन राजधानी क्वालालंपूर इथे असून पेट्रोनास या कंपनीची आहे. पाईपलाईनमधून गॅसची गळती झाल्याने ही आग लागली. आग लागल्यामुळे होरपळलेल्या, श्वसनाला अडथळे निर्माण झालेल्या तसंच अन्य दुखापतींमुळे जखमी झालेल्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.